# महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

दुरध्वनी क्रमांक ०२३३२३२५९१४ E-mail-icdsdyceo@gmail.com

## कोटेशन मागणी नोटीस

जाक्र.जिपंसा/मबाक/आस्था/केट/वशि/२३१/२०२३-२४ दिनांक २८/२/२०२४

प्रति,

---------------------------------

---------------------------------

**विषय :- सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात जि.प.स्वीय निधीमधून मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण- केटरिंग प्रशिक्षण देणेकरिता दरपत्रक सादर करणेबाबत.**

जिल्हा परिषद स्वीय निधी सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत केटरिंग प्रशिक्षण देणेकरिता स्थानिक निविदा धारकांकडून खाली नमूद केलेनुसार तांत्रीक व दराचा सिलबंद लखोटा अशा दोन लखोटे पध्दतीने दरपत्रके मागविणेत येत आहेत.

प्रशिक्षणाची जागा ही संबंधित बाल विकास अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करणे,त्या ठिकाणी भौतिक सुविधा संस्थेने करणे,प्रशिक्षण साहित्य व कच्च्या मालाची व्यवस्था करणे, लेखन सामुग्री, कोर्सबाबत आवश्यक साहित्य इत्यादी बाबी संस्थेने पुरविणे यासह दरपत्रक मागणी करणेत येत आहे.

**कामाचे नांव** - महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,सांगली अंतर्गत जिल्हा परिषद,स्वीय निधी मधून सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत ९० तासांचे दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन प्रशिक्षण देणे.

**प्रशिक्षण ठिकाण प्रकल्प** :- १) कडेगांव -८३ लाभार्थी (मिरज-१ लाभार्थी , तासगांव-१ लाभार्थी त्यांचे इच्छेनुसार कडेगांव येथे प्रशिक्षण घेवू शकतील ) असे एकूण ८५ लाभार्थी.

**प्रशिक्षणाचे स्वरुप** :-(१) व्हेज / नॉनव्हेज जेवण, बिर्याणी,भात,पुलाव,कोशिंबीरचे विविध प्रकार तयार करणे (२) स्वास,भेळ,डोसा, ऑम्लेट, सांभार,बटाटा भजी,भडंग ,पोहे, बटाटा भजी, बटाटा वडा इत्यादी तयार करणे. (३) विविध मसाले तयार करणे (४) पंजाबी डिशेस,चिकन चायनिज,मंच्युरीयन इ.तयार करणे (५) दाबेली,पाणीपुरी,शेवपुरी,रगडा पॅटीस,सँडविच इ.तयारकरणे. (६) चहा व चहाचे विविध प्रकार (७) दही,रायता,रसमलाई, इ.तयार करणे. ८) विविध ग्रेव्ही,विविध रस्सा प्रकार,इ.तयार करणे प्रशिक्षण देणे.

**सादर करावयाची कागदपत्रे (लखोटा क्रमांक -१) :-** संस्थेचे शासकिय नोंदणी प्रमाणपत्र २) संस्था कौशल्य विकास विभागाकडे V.T.P. (Vocational Training Provider) म्हणून नोंद असलेचे प्रमाणपत्र ३) संस्थेचे पॅनकार्ड ४) संस्थेचे GST प्रमाणपत्र / सूट असलेस सूट प्रमाणपत्र ५) संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न ६) संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट ७) शासकिय कामाचा अनुभव असलेबाबत आदेशाची प्रत ८) संस्था काळया यादीत नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र.

**टिप** - १) एका लाभार्थीवर जास्तीत जास्त ५०००/- खर्च करणेत येईल.
२) प्रशिक्षण किंमतीच्या १० टक्के होणारी रक्कम लाभार्थीकडून संस्थेने भरुन घेणे आवश्यक आहे.सदरची होणारी रक्कम देयकातून वजा करुन घेणेत येईल व उर्वरीत देयक अदा करणेत येईल.

**लखोटा क्र.२- दराचा लखोटा -**

| प्रशिक्षणाचे नाव | एकुण दिवस | प्रशिक्षणाचे एकूण तास | ९० तासांचे प्रशिक्षण देणेसाठी प्रति लाभार्थी एकुण दर नमूद करावेत. |
|---|---|---|---|
| केटरिंग प्रशिक्षण देणे | आदेशानुसार | ९० | --- |

वर नमूद केलेनुसार सदर योजनेचे दरपत्रक दिनांक २८.२.२४ ते ०१.३.२४ या कालावधीत महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली येथे सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करणेत यावेत.तदनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.सदरची दरपत्रके त्याच दिवशी किंवा कार्यालयीन सोयीच्या दिवशी उघडणेत येतील.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद,सांगली

प्रत :- सदरची कोटेशन मागणी नोटीस कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत यावी.